*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

*NAVJYOT / Vol. XV / Issue – I* *ISSN 2277-8063*

# महाराज सयाजीराव गायकवाड आणि राजर्षी शाहू महाराज यांचे विचार व कार्य

**प्रा. रुपेश जाधव**. प्राध्यापक :राज्यशास्त्र विभागराजा श्रीपतराव भगवंतराव महाविद्यालय,औंधमो: 8208239082

email: rupeshjadhav2220@gmail.com

---

**सांराश (Abstract)**

महाराज सयाजीराव गायकवाड बडोदा (1875 ते 1939) व राजर्षी शाहू महाराज कोल्हापूर (1894 ते 1922) हे विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळातील महाराष्ट्रातील व भारतातील पुरोगामी राजकर्ते होते. त्यांनी समाजातील दुर्बल, शोषित, उपेक्षित आणि मागासवर्गीय लोकांच्या उन्नतीसाठी महत्त्वपूर्ण सामाजिक व आर्थिक सुधारणा केल्या. त्यांच्या या कार्यामुळे समाजात समता, शिक्षणाचा प्रसार झाला. आणि आर्थिक विकास यांना चालना मिळाली. दोन्ही राज्यांनी आपापल्या संस्थानात राबवलेले लोककल्याणकारी कार्य आजच्या शासनाला दिशादर्शक आहेत. राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात दुर्बल, वंचित शोषित यांना दिलेले आरक्षणाचा प्रभाव आजच्या भारतीय राज्यघटनेवर निर्मिती झाल्याचे दिसते.महाराज सयाजीराव गायकवाड राजर्षी शाहू महाराज यांनी आपला राजकारभार जनतेसाठी चालवला. जनतेच्या सर्वांगीण विकासाची काळजी घेतली.ब्रिटिश राजकर्त्यांच्या पुढे जाऊन त्यांनी अनेक क्रांतिकारक निर्णय घेतले. आणि एका लोककल्याणकारी राज्याचा पाया रचला. राजर्षी शाहू महाराज व महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या तात्कालीन भारतीय सामाजिक राजकीय आर्थिक परिस्थितीचा आढावा घेताना जवळपास सर्वच प्रांतामध्ये सारखीच प्रसिद्धी होती यामध्ये राजकीय परिस्थितीमध्ये तात्कालीन ब्रिटिश सत्तेखाली सर्वच प्रांत होते. यामध्ये त्यांनी दोन प्रकारात वर्गीकरण केले होते. एक ब्रिटिश प्रांत व दुसरे संस्थानाचे प्रांत यांच्यामार्फत संपूर्ण देशाचा कारभार ब्रिटिश चालवत असत. महाराष्ट्रात 19 व्या शतकात 1818. ला मराठेशाही जाऊन हिंदुस्थानासह सर्व महाराष्ट्र ब्रिटिश सत्तेच्या अमलाखाली आला. छोट्या मोठ्या 565 हून अधिक संस्थानावर ब्रिटिश हुकूमत आली यामध्ये कोल्हापूर व बडोदा ही दोन्ही संस्थांनी ब्रिटिश अधिपत्याखाली होती.

**प्रस्तावना**

इ.स.1875 ते इ. स.1939 दरम्यान सहजराव गायकवाड बडोदा संस्थानाचे अधिपती होते. ते अत्यंत पुरोगामी वृत्तीचे ,कर्तृत्वान होते. बडोदा संस्थानातील प्रजेच्या कल्याणासाठी केलेले कार्य महत्त्वाचे आहे.सामाजिक क्षेत्रात सयाजीराव गायकवाड यांनी केलेली कामगिरी ही त्यांच्या सामाजिक स सुधारणेची साक्षी देणारे आहे.पडदा पद्धती बंदी, बालविवाह बंदी कन्या विक्रय बंदी, स्त्रियांना वारसा हक्क मिळवून देणे, अस्पृश्यता निवारण, विधवा विवाह इ. सुधारणा प्रत्यक्षात अमलात आणल्या. घटस्फोटासंबंधीच्या कायदा सर्व भारतात पहिल्यांदाच त्यांनी जारी केला. हरिजनासाठी अठरा शाळा काढल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली आणि त्यांनी संस्थानात उच्च पदावर नेमणूक केली. सयाजीराव महाराजांनी राजेशाहीचे लोकशाहीत रुपांतर करण्याची धाडसी प्रयोग करून भारताच्या जडणघडणीचा पाया रचला. जनतेला मतदानाचा अधिकार, ग्रामपंचायतीची स्थापना, सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा,वाचनालयाची स्थापना, अस्पृश्यता, वेठबिगारी-बालविवाह प्रतिबंधक कायदे, राज्यात समृद्धी आणण्यासाठी रस्ते,पाणीपुरवठा जमीन सुधारणा,आरोग्य सेवा, उद्योग व्यवसायासाठी कौशल्य, शिक्षण,कायद्याचे सामाजिककरण व पारदर्शी प्रशासनासाठीजनमाध्यमाचा प्रभावी वापर अशा अनेक मार्गांनी त्यांनी विधायक राजनीतीचा आदर्श निर्माण केला.नागरिकांमध्ये साहित्य व कलेची अभिरुची निर्माण करण्यासाठी आणि कलावंतांना राजाश्रय देण्यासाठी त्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. यशस्वी राज्यकर्ता, कुशल प्रशासक आणि दृष्ट्या विचारवंताची सर्व गुणवैशिष्ट्ये महाराजांकडे होतीच. महाराज सयाजीराजांना अर्थ करण्याची जाण असल्याने 'बँक ऑफ बडोद्याची स्थापना 'हे त्यांच्या कारकिर्दीतले महत्त्वाचे कार्य होते. त्यांनी

बँकेची परवानगी मिळण्यासाठी आठ वर्षे प्रयत्न करावे लागले. शेवटी बँक स्थापन झाल्यावर त्यांच्या व्याजातून आपण च स्थापन केलेल्या विद्यापीठातील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण मिळावे अशी व्यवस्था त्यांनी केली.

राजर्षी शाहू महाराजांकडे राजकारभाराची सूत्रे हाती घेतल्यानंतर त्यांनी कोल्हापूर संस्थानच्या राज्यकारभारात ब्राह्मणांची मक्तदारी अधिक असल्याचे दिसून आले.याबाबत राजर्षी शाहू महाराज म्हणतात विविध जातींचे लोक प्रशासनात असणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने त्यांनी ब्राह्मण सेवकांचा प्रशासनावरील प्रभाव कमी करण्यासाठी आणि सर्व समाज घटकांना सहभागी करण्याच्या हेतूने त्यांनी पूर्वीचे 'राज प्रतिनिधी मंडळ' नेमले तसेच त्यांनी सर्व जातीधर्मांच्या लोकांच्या विकासाचे धोरण निर्माण करून त्यांनी एकाच जातीला राज्यकारभारात स्थान न देता सर्व जातींचा सहभाग करून घेतला.यासाठी त्यांनी जुलै 1902 साली प्रशासनातील नोकरीत मागासलेल्या जातींना 50 टक्के आरक्षणाची तरतूद केली. मागासलेल्या मराठा, शेतकरी. जैन लिंगायत व इतर तत्सम जाती समावेश होता. यावरून राजर्षी शाहू महाराजांच्या समाजाविषयक सूक्ष्म अवलोकन असलेली दृष्टी दिसते.राजर्षी शाहू महाराज यांनी बहुजन समाजाला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. गरीब गरजू, व दलित व बहुजन समाजाला मानवी मूलभूत हक्क मिळवून देऊन त्यांना स्वराज्याला पात्र बनवणे हीच खरी राजर्षी शाहू महाराजांची स्वराज्य बद्दलची वास्तववादी कल्पना होती. आणि त्यासाठी त्यांनी प्रयत्न केले.राजर्षी शाहू महाराज यांनी आपली कार्य व विचारातून शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रात सुधारणा केल्या. याचा परिणाम महाराष्ट्रातील सर्वांगीण क्षेत्रात झाला असून यातून समाजात पुरोगामी विचारांचे नवीन नेतृत्व उदयास आले. महाराज सयाजीराव गायकवाड आणि राजर्षी शाहू महाराज यांनी केलेले प्रशासकीय, सामाजिक ,आर्थिक, राजकीय सांस्कृतिक विकासाचे कार्य विचार पुढील प्रेरणा देणारे ठरते.

**विषयविवेचन**

राजर्षी शाहू महाराजआणि सयाजीराव गायकवाड यांनी सर्व क्षेत्रात लोकोपयोगी व समाजहिताची कामे केली आहेत.समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता, न्याय तसेच सर्व घटनांना विकासाची समान संधी ही तत्वे संस्थानात अंमलात आणली. तसेच संस्थानातील सामाजिक शैक्षणिक ,आर्थिक विकासास चालना दिली. तत्कालीन परिस्थितीत अनेक कल्याणकारी व क्रांतिकारी निर्णय घेतले.

महाराज सयाजीराव गायकवाड व राजर्षी शाहू महाराज यांनी राजकीय, सामाजिक ,आर्थिक, प्रशासकीय, शैक्षणिक, शेती कला,क्रीडा व संस्कृती या सर्व क्षेत्रात लोककल्याणकारी कार्य करून त्या निर्णयाची अंमलबजावणी केली .तसेच त्यांनी आपल्या कारकिर्दीतमध्ये शूद्र ,अस्पृश्य जातीसाठी विकासाची दारे खुली केली. आरक्षण, राखीव जागा, शिष्यवृत्ती इतर मदतीच्या माध्यमातून हजारो वर्षापासून वंचित जाती, जमातींच्या सामाजिक व आर्थिक विकास घडवून आणला सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी विशेष प्रयत्न केले. त्यामुळे आज त्यांचे कार्य महत्त्वपूर्ण ठरते. कारण आजही कल्याणकारी राज्य कसे असावे हे महाराज सयाजीराव गायकवाड आणि राजर्षी शाहू महाराज यांच्या कार्यातून दिसून येते. त्यांचे कार्य आजच्या शासनाला सुद्धा दिशादर्शक आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

1) महाराज सयाजीराव गायकवाड व राजर्षी शाहू महाराज यांच्या सामाजिक सुधारणा वरील भूमिका जाणून घेणे.

2) महाराज सयाजीराव गायकवाड राजर्षी शाहू महाराज यांनी केलेल्या दलित मागासवर्गीय व महिलांच्या उन्नतीच्या कार्यांचा अभ्यास करणे.

3) महाराज सयाजीराव गायकवाड व राजर्षी शाहू महाराज यांच्या विचार आणि कार्याचा आजच्या समाजावर असलेला प्रभावाचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहीतके**

1 ) महाराज सयाजीराव गायकवाड व राजर्षी शाहू महाराज हे सामाजिक समतेचे पुरस्कर्ते होते.

2) महाराज सयाजीराव गायकवाड आणि राजर्षी शाहू महाराज यांनी दलित मागासवर्गीय व महिलांच्या उन्नतीसाठी अनेक कार्य केले.

3) महाराज सयाजीराव गायकवाड आणि राजर्षी शाहू महाराज यांच्या विचार आणि कार्याचा आजच्या समाजात प्रभाव दिसून येतो.

**संशोधन पद्धती**

1) प्रस्तुत शोधनिबंधामध्ये महाराज सयाजीराव गायकवाड आणि राजर्षी शाहू महाराज यांच्या विचार व कार्याचा अभ्यास करण्यासाठी ऐतिहासिक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे.तसेच प्राथमिक व दुय्यम साधनांचा मासिके वर्तमानपत्रे. प्रकाशित ग्रंथ व इंटरनेट इ .

**निष्कर्ष**

1) महाराज सयाजीराव गायकवाड व राजर्षी शाहू महाराज समाजाच्या बहुजन, उपेक्षित व दलित या लोकांसाठी रचनात्मक धोरणात्मक निर्णय घेतले.

2) महाराज सयाजीराव गायकवाड व राजर्षी शाहू महाराज यांचे विचार व कार्य आजच्या शासनाला दिशादर्शक आहेत.

3) महाराज सयाजीराव गायकवाड व राजर्षी शाहू महाराज या दोन्ही राज्यांनी ब्रिटिश राजवटीमध्ये आपल्या संस्थांनामध्ये लोककल्याणकारी राज्याचा पुसस्कार करून लोकशाही शासन पद्धतीचा पाया घातला.

4) महाराज सयाजीराव गायकवाड राजर्षी शाहू महाराज या दोन्ही राजांनी समाजातील दुर्बल घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केले.

5 ) महाराज सयाजीराव गायकवाड व राजर्षी शाहू महाराज दोन्ही राजेंच्या सामाजिक न्याय, समता व न्याय याचा प्रभाव आजच्या भारतीय संविधानामध्ये दिसतो.

**संदर्भसूची**

1)भांड बाबा. महाराजा सयाजीराव गायकवाड गौरवगाथा युगपुरुषाची, खंड 12 चरित्र साधने प्रकाशन समिती,औरंगाबाद. 2017

2) पवार जयसिंगराव राजर्षी शाहू पंचखंडात्मक, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर ,2001

3) जाधव रमेश, लोकराजा शाहू छत्रपती सुरेश एजन्सी, पुणे ,1997

4) निकम गौतम, लोककल्याणकारी राजा सयाजीराव गायकवाड विमलकृती प्रकाशन चाळीसगाव,2013

5) भोळे भा. ल. छत्रपती शाहू महाराज गंधर्ववेद प्रकाशन, पुणे 2010

6).फडके. य. दि शाहू छत्रपती आणि लोकमान्य श्रीविद्या,प्रकाशन, पुणे 1986,

7) भांड बाबा, लोकपाल राजा सयाजीराव, साकेत प्रकाशन औरंगाबाद, 2013.